
# भावार्थ ज्ञानेश्वरी

(२१ व्या शतकासाठी)

अध्याय तेरावा , भाग चौथा

सुलभ ओवीबद्ध रचना



विजय बळवंत पांढरे B.E. (Civil)

ई-आवृत्ती

साहित्य प्रतिष्ठान®

भावार्थ ज्ञानेश्वरी(२१व्या शतकासाठी)

अध्याय तेरावा : भाग चौथा

मूळ लेखन : संत श्री ज्ञानेश्वर (इ.स. १२९१)

२१व्या शतकातील मराठीत ओवीबद्ध रुपांतर (इ.स. २०१०):

श्री विजय पांढरे

मु पो लाखनवाडा,

ता. खामगांव,

जि बुलढाणा. महाराष्ट्र.

9822992578

vbpandhare@gmail.com

ई प्रकाशन :

ई साहित्य प्रतिष्ठान®

9869674820

esahity@gmailcom

www.esahity.com

E Sahity Pratishthan

Eleventh floor(G1102)

Eternity

Eastern Express Highway

Thane, Maharashtra. 400604

मुखपृष्ठ रचना : श्री जावेद शेख

©श्री विजय पांढरे(२०१२)

**या पुस्तकाची प्रिंट स्वरुपातील आवृत्ती मुकुंदराज महाराज संस्थान यांनी प्रकाशित केली असून ती ३९०/- रुपयांना उपलब्ध आहे.**

प्रस्तुत ई आवृत्ती ही विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध असून कोणीही आपल्या वेबसाईट्वर डाऊनलोडसाठी विनामूल्य उपलब्ध करण्यास प्रकाशकांची कोणतीही हरकत नाही. या पुस्तकाची ई आवृत्ती प्रत्येक मराठी माणसाच्या डेस्कटॉपवर असावी हे आमचे ध्येय असून त्यासाठी **प्रत्येक मराठी माणसाचे सहकार्य अपेक्षित आहे.**

# ॥ ज्ञानेश्वरी ई पारायण अभियान ॥

जगातील सर्वोत्कृष्ट ग्रंथांपैकी श्री ज्ञानेश्वरी हा ग्रंथ आहे. त्यात परमार्थ तर आहेच. पण परमार्थाची खरी सुरूवात मनुष्य जन्म उत्कृष्टपणे जगण्यातून होते. कसे जगावे याचे उत्कृष्ट विवेचन सुंदर रितीने ज्ञानेश्वरीत केले आहे. प्रत्येक मराठी माणसाने वाचलेच पाहिजेत असे ग्रंथ म्हणजे छत्रपती शिवरायांचे चरित्र आणि श्री ज्ञानेश्वरी. पण ज्ञानेश्वरी प्रत्येक मराठी माणूस वाचतोच असे नाही. कारण १२९१ साली प्रचलित असलेल्या प्राकृतबहुल मराठीत लिहीलेली ज्ञानेश्वरी आजच्या तरुणांना समजायला कठीण जाते. अनेकजण प्रयत्न करतात पण नंतर सोडून देतात. कारण प्राकृत भाषा आजच्या तरूणाच्या ओळखीची राहिलेली नाही.

अशा वेळी ई साहित्य प्रतिष्ठान सादर करीत आहे २१व्या शतकातील सोप्या मराठीत ओवीबद्ध केलेली भावार्थ ज्ञानेश्वरी. श्री विजय पांढरे यांनी अत्यंत सोप्या भाषेत आणि २१व्या शतकातील तरुणांना समजेल अशा भाषेत ज्ञानेश्वरीचे केलेले रुपांतर आपल्याला आवडेलच. कारण मूळ ज्ञानेश्वरीतील गोडवा त्यांनी जसाचा तसा जपला आहे. रोज केवळ अर्धा तास, असे फ़क्त एकोणतीस दिवस वाचन करून आपण ज्ञानेश्वरीचे पूर्ण पारायण करू शकता. श्री विजय पांढरे लिखित २१व्या शतकासाठी सध्याच्या मराठीत ओवीबद्ध केलेली भावार्थ ज्ञानेश्वरीची भॆट आम्ही आज ई साहित्य प्रतिष्ठानच्या व्यासपीठावरून सादर करीत आहोत. ही ज्ञानेश्वरी मूळ ज्ञानेश्वरीप्रमाणेच ओवीबद्ध असून समजायला खूपच सोपी झाली आहे. मूळ प्राकृत ज्ञानेश्वरीइतकीच रसाळ. या ज्ञानेश्वरी सोबत मूळ ज्ञानेश्वरीचीही ई प्रत विनामूल्य उपलब्ध आहे. अधिक माहितीसाठी व अभियानात सामिल होण्यासाठी खालील लिंक्सना भेट द्या.

www.esahity.com http://www.facebook.com/edyaneshwari
http://edyaneshwari.blogspot.in/ http://youtu.be/yCHZ85Xzuxc

तैसे ते अविनाशी । अस्तित्वाची सूक्ष्म दशा जैसी । तया ज्ञेय ऐसी । संज्ञा होय ॥९१४॥
एकच असते आत बाहेर । सर्वत्र जवळ आणि दूर । म्हणून अनंत आणि अपार । म्हणती तया ॥९१५॥
नसते क्षीरसागराची गोडी । मध्यात जास्त किनाऱ्यावर थोडी । तैसी ही ब्रह्ममयतेची वाडी । परीपूर्ण गा ॥९१६॥
सर्व चराचरासी व्यापुनि । स्वेदजादि प्राणी । अस्तित्वाची सर्व कहाणी । ब्रह्माठायी ॥९१७॥
जसे हजारो त्या मडक्यात । चंद्रबिंब असे पडत । पण फरक कधीच नसे पडत । चंद्रात कधी ॥९१८॥
जैसे मिठाच्या त्या ढीगात । एकच चव असे वसत । आणि गोडी कोटी उसात । एक अर्जुना ॥९१९॥
तैसे ते एकत्वानं । सर्वत्र असे जे व्यापून । विश्व उत्पत्तीचे मूळ कारण । ब्रह्म अर्जुना ॥९२०॥
जैसे सर्व तरंगाचा आधार । एकचि असे सागर । तैसे निर्माण होती चराचर । ब्रह्माकारणे ॥९२१॥
बाल्य तारुण्य वृद्धत्वपण । जसे एका देहाठायीच असणं । तैसे आदि मध्य अवसान । ब्रह्माठायी ॥९२२॥
सकाळ संध्याकाळ होत । दिनचक्र असे चालत । पण होतो का फरक आकाशात । कधी अर्जुना ॥९२३॥
सृष्टीनिर्मितीच्या वेळेस । ब्रह्म म्हणती तयास । आणि वाढीच्या समयास । नाम विष्णू ॥९२४॥
मग हारपता आकार । तया म्हणतात रुद्र । तिन्ही गुणांच्या पार । शून्य जे ॥९२५॥
गुणत्रयासी संपवून । नभाचे शून्यत्व गिळून । जया शून्य महाशून्य । श्रुती म्हणती ॥९२६॥
जे अग्नीचं प्रकाशणं । जे चंद्राचे जीवन । अथवा सूर्याचे नयन । देखते जे ॥९२७॥
जयाच्या तेजाने । तारांगणाचे चकाकणे । महातेज ज्याच्या आधाराने । रहाते जगती ॥९२८॥
जे आदीची आदि । वृद्धिची वृद्धि । बुद्धिची जी बुद्धि । जिवाचा जीव ॥९२९॥
जे मनाचे मन । जे नेत्राचे नयन । जे कानाचे कान । वाचा वाचेची ॥९३०॥
जे प्राणाचा प्राण । जे गतीचे चरण । क्रियेठायी कर्तेपण । जयाचे कारणे ॥९३१॥
जेणे कारणे आकार । जेणे कारणे विस्तार । जेणे कारणे संहार । होतसे अर्जुना ॥९३२॥
वायू आणि श्वासोच्छ्वास । गगन आणि अवकाश । आघवाचि हा आभास । जयाचे मूळ ॥९३३॥
किंबहुना पांडवा । जो असे आघवाचि आघवा । जेथे त्या द्वैतभावा । प्रवेश नाही ॥९३४॥
जयाचि येता अनुभूति । द्रष्टा दृश्य हारपती । ऐसी ती एकत्वाची स्थिती । जी ब्रह्ममयता ॥९३५॥
तेचि होय दर्शन । ज्ञाता ज्ञेय ज्ञान । सर्व भेद जाती संपून । तेथे अर्जुना ॥९३६॥
मनइंद्रिया पलीकडे जाता । पंचभुते ती लोपता । अनुभवा येते ती एकता । अंतरंगी अर्जुना ॥९३७॥
अर्जुना त्या ठिकाणी । नाही द्वैताची कहाणी । स्वयेचि ब्रह्म होऊनि । रहाणे तेथे ॥९३८॥
ऐसे संपूर्ण क्षेत्राला । अर्जुना मी सांगितले तुजला । प्राप्त होता समजेला । ज्ञान होते ॥९३९॥
क्षेत्राच्या त्यानंतर । दाविले ज्ञान अपार । त्रिपुटीचा तो व्यवहार । समजविला तुजसी ॥९४०॥
नंतर पहा विस्तारून । मी सांगितले अज्ञान । वर्णन ते ऐकून । भांबावलास तू ॥९४१॥
आता फोड ती करून । ज्ञेयही सांगितले समजावून । अंतरी त्रिपुटी अनुभवणं । ज्ञान अर्जुना ॥९४२॥
हे सर्व बा ऐकून । लागते मज प्राप्तीची तहान । जयाने जिवाचे कल्याण । होते अर्जुना ॥९४३॥
अनित्यता देहाची जाणून । मनइंद्रियाना त्यागून । मजसी एकरूप होणं । भक्ती अर्जुना ॥९४४॥
अंतरी ब्रह्ममय होणे । तेचि बा मजसी जाणणे । मीच होऊन मला अनुभवणे । सूत्र अर्जुना ॥९४५॥
मनइंद्रिया त्यागता । आशा इच्छा विरता । विचारकल्पना संपता । भेट माझी ॥९४६॥
रहस्य जे उमजता । प्रकटते ब्रह्ममयता । ते सूत्र तुला आता । सांगितले मी ॥९४७॥



For Complete Dnyaneshwari Visit : www.esahity.com

केवळ ग्रंथ ते वाचून । न होते कधी ज्ञान । इच्छा कल्पना संपणं । सूत्र आहे ॥९४८॥
तहान तुझी पाहून । सांगितलं मी ज्ञान । आता संपू दे ते मन । प्रकटण्या ब्रह्म ॥९४९॥
न संपता इच्छा वासना । कैसे पावशील ज्ञाना । निरसू दे त्या मना । होण्या ज्ञान ॥९५०॥
मनाचि व्यर्थता जाणून । घडो इच्छा वासनाचं त्यागणं । मग होते पहा ज्ञान । अर्जुना माझ्या ॥९५१॥
इतके सार समजावून । जर नसेल घडलं ज्ञान । तर समजावतो अजून । अर्जुना तुजला ॥९५२॥
आता वेगळ्या रीतीनं । मी सांगतो समजावून । आत्म अनात्म ज्ञान । ऐकावे आता ॥९५३॥
एकचि माझं मागणं । द्यावेस तू अवधान । अंतरी घडता श्रवण । कल्याण तुझे ॥९५४॥
या देवाचिया बोला । पार्थ रोमांचित जाहला । एकाग्र करून चित्ताला । ऐके मग ॥९५५॥
प्रकृति पुरुषाचं वर्णन । आता करतील भगवान । सर्वांनी लक्ष देऊन । ऐकावे आता ॥९५६॥
गहन ते तत्त्वज्ञान । सांख्य म्हणती योगीजन । मीच ते कपील होऊन । सांगितले होते ॥९५७॥
ज्ञान जे अति निर्दोष । प्रकृति आणि पुरुष । ते सर्व विशेष । सांगेन आता ॥९५८॥
दिवस रात्री प्रमाणं । पुरुष प्रकृति दोन । अनादि तू जाण । अर्जुना माझ्या ॥९५९॥
जसे शरीराच्या बरोबर । सावलीचा होतसे वावर । वा त्या धान्य कणाबरोबर । कोंडा जैसा ॥९६०॥
तैसी ही दोन । अनादि तू जाण । अस्तित्वाचे ते प्रकटन । दोहोसंगे ॥९६१॥
क्षेत्र या नावाने । जे येथे प्रसिद्ध असणे । त्या पंचभुता तू जाणणे । प्रकृति गा ॥९६२॥
या प्रकृतिस जो जाणतो । तोच पुरुष असतो । नित्य चिरंतन नांदतो । तो जगती अर्जुना ॥९६३॥
निरनिराळ्या त्या शब्दानं । ज्ञानी करती निरूपण । पण नसतीच ते भिन्न । अर्जुना माझ्या ॥९६४॥
येथे जी मूळ सत्ता । तोच पुरुष तत्त्वत: । आणि पुरुषच पांडुसुता । बनतसे प्रकृति ॥९६५॥
बुद्धि इंद्रिय अंत:करण । सत्त्व रज तमोगुण । या सर्वांचं प्रकटन । प्रकृति अर्जुना ॥९६६॥
हा अस्तित्वाचा मेळावा । तो प्रकृतिच जाणावा । येथे जे येते अनुभवा । ती प्रकृति अर्जुना ॥९६७॥
प्रकृतिच्या कारण । मीपणाचं भासणं । तेच बा मूळकारण । भवचक्राचे अर्जुना ॥९६८॥
मीपणाच्या कारण । इच्छा बुद्धि प्रकटन । मग अखंड ते कार्यकारण । चाले येथे ॥९६९॥
त्या इच्छांच्या कारण । होई विचारांचं प्रकटन । मनइंद्रियांना राबवणं । घडे तेथे ॥९७०॥
अवघे सारे कार्यकारण । त्या प्रकृतिच्याच कारण । आणि पुरुष अधिष्ठान । आहे येथे ॥९७१॥
ऐशा या कार्यकारणात । कर्म असे प्रकटत । मग त्रिगुण ते जन्मतात । कर्माठायी ॥९७२॥
वाढता ते सत्त्वगुण । घडे सत्कर्मांचं वाढणं । आणि वाढता रजोगुण । निपजे मध्यम ॥९७३॥
वाढता तो तमोगुण । घडे अधम कर्मांचं घडणं । निषिद्ध ते तू जाण । अर्जुना माझ्या ॥९७४॥
ऐसे हे त्रिगुण । उत्पन्न होता प्रकृतीपासून । मग सुखदु:खाचं अनुभवणं । घडे तेथे ॥९७५॥
अधर्मे कर्मी दु:ख प्रकटने । सत्कर्मी सुख निपजणे । मग सुखदु:खाचं अनुभवणे । पुरुषाठायी ॥९७६॥
जोवरी सुखदु:खे सत्य भासती । तोवरी चाले तयांची निर्मिती । सुखदु:खाची ही गती । भ्रमच की ॥९७७॥
प्रकृतीच्या कारणे । भ्रमाचे सत्य वाटणे । तेच आत्मतत्त्वाचे विस्मरण होणे । अर्जुना माझ्या ॥९७८॥
प्रकृतीशी तादात्म्य तुटता । प्रकटते ती चिरंतनता । वस्तूची वस्तूशी भेट होता । आत्मज्ञान ॥९७९॥
आता ऐक पुरुषाचे वर्णन । जो निराकार आणि निर्गुण । जीर्णाहून अतिजीर्ण । तो पुरुष अर्जुना ॥९८०॥
तयाचे नाव पुरुष । एऱ्हवी स्त्री ना नपुंसक । तयाची होणे ओळख । कठीण अर्जुना ॥९८१॥


For Complete Dnyaneshwari Visit : www.esahity.com

नसती नयन आणि कान । नाही हात वा चरण । नसे नामरूपवर्ण । तेथे अर्जुना ॥९८२॥
अर्जुना जो काही नाही । तो प्रकृतीचा अनुभव घेई । सुखदु:ख ते अनुभवा येई । तया अर्जुना ॥९८३॥
जरी असे तो अकर्ता । अति उदास आणि अभोक्ता । परि ही प्रकृती तत्त्वत: । भोगवी त्यासी ॥९८४॥
होता रूपगुणाची उधळण । पुरुष जातसे भुलून । मग स्वत:चेच विस्मरण । घडे पुरुषा ॥९८५॥
ऐसी ही प्रकृती । नाटकी आणि गुणवती । भ्रमतसे पुरुषाची मती । प्रकृतीकारणे ॥९८६॥
नित्य नवी प्रतिक्षणी । रूपगुणाची खाणी । सर्वजगा भ्रमवुनि । नांदे येथे ॥९८७॥
जयासी म्हणतात मन । ते प्रकृतीचचं असणं । इंद्रिय आकार प्रकटन । प्रकृतीठायी ॥९८८॥
पुरुष असूनही नपुंसक । भोगतसे तिन्ही लोक । ऐसी पहा अलौकिक । करणी हिची ॥८८९॥
हे भ्रमाचे महाद्वीप । अरूपी प्रकटले रूप । विकार गुण अमुप । तेथे अर्जुना ॥९९०॥
ही वासनांची खाण । जे भ्रांतीचे वन । माया नाव म्हणून । प्रसिद्ध तिचे ॥९९१॥
चार वाचांचा विस्तार । नामरूपाचा उभार । जन्ममृत्यू ते निरंतर । करणी हिची ॥९९२॥
कला प्रकटल्या येथून । विद्या इच्छा ज्ञान । होतसे हिच्याचपासून । निर्मिती सारी ॥९९३॥
ही नादाची टांकसाळ । हे चमत्काराचे जंजाळ । किंबहुना भ्रम सकळ । खेळ हिचा ॥९९४॥
उत्पत्ती प्रलय तो होणं । ते प्रकृतीच्याच कारणं । ऐसी विलक्षण संमोहन । प्रकृती अर्जुना ॥९९५॥
अद्वैती प्रकटवून द्वैत । असे पहा ती नांदत । घर बांधून त्या शून्यात । रहाणे तिचे ॥९९६॥
पहा हिची करामत । अनासक्त पुरुष ताब्यात । भवचक्र मग अखंडित । चाले तेथे ॥९९७॥
जेथे काहीच बा नव्हते । तेथे सर्वकाही प्रकटते । सर्वकाही होऊन जाते । ही प्रकृती अर्जुना ॥९९८॥
ऐसी स्वयंभू ही प्रकृती । अमूर्ताठायी प्रकटे मूर्ती । अखिल विश्वाची निर्मिती । प्रकृती कारणे ॥९९९॥
त्या स्वयंभूची उत्पत्ती । त्या अमूर्ताची मूर्ती । आपणच होते प्रकृति । स्थिती तेथे ॥१०००॥
त्या अनार्ताची आर्ती । तया पूर्णाची तृप्ती । तया अकुळाची जाती । प्रकृतीच होते ॥१००१॥
त्या वर्णनातीताचे वर्णन । अपाराचे आकारमान । त्या अमनस्काचे मन । प्रकृतीच होते ॥१००२॥
त्या निराकारी आकार । त्या निर्व्यापारी व्यापार । निरहंकारी अहंकार । होऊनि ठाके ॥१००३॥
त्या अनामाचे नाम । त्या अजन्मांचे जन्म । आपणच होते कर्म । प्रकृती तेथे ॥१००४॥
त्या निगुर्णाचे गुण । त्या अचरणाचे चरण । त्या अश्रवणाचे श्रवण । होते प्रकृति ॥१००५॥
त्या भावातीताचे भाव । त्या निरवयवाचे अवयव । किंबहुना होते सर्व । प्रकृतीच तेथे ॥१००६॥
अशा या रीतीने । प्रकृतीच्या त्या विस्तारानं । पुरुष जो विकार हीन । विकारी भासे ॥१००७॥
ऐसे या पुरुषानं । प्रकृती स्वरूप होणं । ते अमावास्येस न दिसणं । चंद्राचं जसं ॥१००८॥
जसं हिणकस धातूनं । सोन्यात ते मिसळणं । मग कस कमी होणं । सोन्याचा अर्जुना ॥१००९॥
जैसे त्या कुसंगतीकारण । सज्जनही बिघडून जाणं । वा दिवसाही अंधार होणं । येता अभ्र ॥१०१०॥
जैसे दूध पशूच्या पोटात । वा अग्नी तो लाकडात । गुंडाळले जैसे वस्त्रात । रत्न अर्जुना ॥१०११॥
राजाने पराधीन होणे । सिंहास रोगाने घेरणे । पुरुष तैसा प्रकृतिकारणे । मुके स्वतेजा ॥१०१२॥
जैसे त्या जागलेल्याने । निद्रा येता झोपणे । मग घडे स्वप्नांचे प्रकटणे । अवश्य तेथे ॥१०१३॥
तैसे प्रकृति होऊन । पुरुषाने गुण भोगणं । अंतरी संस्कार अनुभवणं । आपण जैसे ॥१०१४॥
तैसे नित्य अजन्मा असून । जन्म मृत्यूचा भास होणं । त्या प्रकृतीगुणाकारण । भास तैसा ॥१०१५॥


For Complete Dnyaneshwari Visit : www.esahity.com

जैसे लोखंड तापवून । तयावर घाव घालणं । ते अग्नीस बा लागणं । मानणे जैसे ॥१०१६॥
पाणी असता हालत । चंद्रबिंब अनेक दिसतात । मग अनेकत्व असे भासत । चंद्राठायी ॥१०१७॥
त्या दर्पणाच्या कारण । होते द्वैताचे प्रकटन । वा स्फटिक तांबडा भासणं । कुंकुवामुळे ॥१०१८॥
तैसे गुण आकाराकारणे । अजन्माचे भासे जन्मणे । परि निर्गुण निराकारपणे । तो अजन्माच की ॥१०१९॥
जसे त्या स्वप्नात । भास असती होत जात । तसे अधमोत्तम योनित । भासे जन्मला ॥१०२०॥
अर्जुना पुरुषाचे ठिकाणी । नाहीच बा भोगाची कहाणी । भ्रमाची ती भासणी । गुणाकारणे ॥१०२१॥
वेल आणि आधारात । जैसा संबंध असे वसत । संबंध पुरुष प्रकृतीत । तैसा अर्जुना ॥१०२२॥
जैसे नदीच्या त्या पाण्यात । प्रतिबिंब पर्वताचे असे पडत । पण नसे ते वाहून जात । तैसे अर्जुना ॥१०२३॥
जग असे होत जात । पण पुरुष नाहीच बा बदलत । ब्रह्मदेवापासून मुंगीपर्यंत । बदलती सर्व ॥१०२४॥
हा जगाचे अधिष्ठान । याचेचमुळे जग प्रकटन । अस्तित्व सर्व जाण । अधीन याच्या ॥१०२५॥
काळ अनंत अनंत । सृष्टी असे होत जात । नि कल्पांती लीन असे होत । पुरुषाठायी ॥१०२६॥
ऐसा हा अनंत । सृष्टी असे प्रकटवत । सामावून घेई सर्व आपल्यात । कल्पांतकाळी ॥१०२७॥
पहा या देहात । जो परमात्मा असे वसत । तयासीच पुरुष म्हणतात । अर्जुना माझ्या ॥१०२८॥
ऐसा जो प्रकृतिपरौता । केवळ अद्वैत पांडुसुता । तयासीच पुरुष तत्त्वता । म्हणती अर्जुना ॥१०२९॥
या पुरुषास जाणणं । तेचि बा आत्मज्ञान । प्रक्रिया अस्तित्वाची उमजणं । सूत्र आहे ॥१०३०॥
काय तो आकार । काय तो निराकार । जाणे मनइंद्रियापार । रहस्य अर्जुना ॥१०३१॥
अस्तित्व प्रक्रियेस जाणणं । तेचि बा आत्मज्ञान । पुरुष प्रकृतीस ओळखणं । ज्ञान आहे ॥१०३२॥
तो राहून शरीरात । दिसतसे सकळ कर्मात । परी निश्चित तो अलिप्त । अंतरी अर्जुना ॥१०३३॥
देहात जरी दिसे । परी देही तादात्म्य नसे । पुनर्जन्म न घडतसे । तयाला अर्जुना ॥१०३४॥
ऐसा बा अर्जुना । जाणे जो या दोहोना । तोच पहा आत्मज्ञाना । प्राप्त झाला ॥१०३५॥
प्राप्त होण्या हे ज्ञान । अनेक मार्गांचं असणं । ऐक ते लक्ष देऊन । अर्जुना आता ॥१०३६॥
कुणी साक्षीभाव प्राप्त होऊन । टाकती संपवून ते मन । मग आत्मतत्त्वाचे ज्ञान । प्रकटे अर्जुना ॥१०३७॥
छत्तीस तत्त्वांना ओलांडून । पंचभुतापार जाणं । मनइंद्रिया तादात्म्य तुटणं । सूत्र आहे ॥१०३८॥
ऐसे साक्षीभाव साधून । स्वप्न सुषुप्ती ओलांडणं । आपली भेट आपण घेणं । ज्ञान आहे ॥१०३९॥
काही ते साधक जन । पोहचती सांख्यमार्गानं । काही कर्मयोग आचरून । मुक्त होती ॥१०४०॥
ऐसे अनेक प्रकारांनी । भवचक्रास त्या भेदुनि । जाती साधक निसटुनि । जन्ममरणातून ॥१०४१॥
काय ते करतात । अहंकार संपू देतात । आणि एकरूप मग होतात । आत्मतत्त्वा ॥१०४२॥
हित अहित जाणून । प्राप्त साक्षीभाव होऊन । करती ते दु:खहरण । अर्जुना माझ्या ॥१०४३॥
ज्ञान्यांच्या त्या वदनातून । निघतसे जे जे वचन । तयाने मन शुद्धी होणं । अनिवार्यच की ॥१०४४॥
उपदेश तो ऐकता । कर्मसिद्धांत तो उमजता । साक्षीभावा प्राप्त होता । ज्ञान होते ॥१०४५॥
अशा या रीतीनं । करून संतवचन श्रवण । भवचक्रातून निसटणं । सूत्र आहे ॥१०४६॥
ऐसे अनेक मार्गानं । अर्जुना होतसे ज्ञान । अहंभाव तो संपणं । रहस्य आहे ॥१०४७॥
अर्जुना सिद्धांत साराला । सांगतसे मी तुजला । प्राप्त होशील ज्ञानाला । उमजता ते ॥१०४८॥
रहस्य ते उमजता । प्रकटते ती ब्रह्ममयता । तर्क बुद्धि त्यागता । ज्ञान होते ॥१०४९॥


For Complete Dnyaneshwari Visit : www.esahity.com

क्षेत्रज्ञ जया म्हणतात । ते सांगितले मी साद्यंत । वर्णन क्षेत्राचेही रसभरीत । ऐकलेस तू ॥१०५०॥
या दोहोंच्या कारण । होतसे सृष्टीचे प्रकटन । जशा लाटा वाऱ्या पाण्यापासून । उत्पन्न होती ॥१०५१॥
घडता वाळवंट किरणांची मेळणी । होते मृगजळाची उपजणी । तैसी भासाची उभारणी । या दोहोंकारणे ॥१०५२॥
जैसे पावसाच्या कारणे । पृथ्वी ती ओलीचिंब होणे । मग तृणांकुर ते उगवणे । आपोआप ॥१०५३॥
तैसे या दोहोंच्या कारणे । नाना जिवांचे प्रकटने । ऐसे सृष्टीचे नांदणे । घडे येथे ॥१०५४॥
त्या क्षेत्रज्ञापासून । होतसे क्षेत्राचे निर्माण । क्षेत्रज्ञ आणि क्षेत्र अभिन्न । असती अर्जुना ॥१०५५॥
जैसे त्या तंतूपासून । होतसे वस्त्राचे निर्माण । तंतू आणि वस्त्र अभिन्न । तैसे अर्जुना ॥१०५६॥
एकाच वस्तूपासून । होते सृष्टी ती निर्माण । परी अंतरी ते अनुभवणं । आवश्यक अर्जुना ॥१०५७॥
रूप तयांचे भिन्न । आणि वेगळाले स्वभावानं । विपरीत ऐसे गुण । अंगी त्यांच्या ॥१०५८॥
कोटी कोटी जन्म घेऊन । न शक्य तयाना जाणणं । इतके विभिन्न विभिन्न । जीव तेथे ॥१०५९॥
जशी गोष्ट दुधी भोपळ्याची । फळे लागती विविध आकाराची । तैसी रचना सृष्टीची । विविध येथे ॥१०६०॥
सरळ असो की वाकडं । ते बोरीचेच लाकूड । तैसे हा सृष्टीचा फड । ब्रह्माठायी ॥१०६१॥
जैसे भिन्न भिन्न निखाऱ्यात । एकचि अग्नी असे वसत । तैसे सर्व चराचरांत । ब्रह्म अर्जुना ॥१०६२॥
जैसे त्या ढगातून । बरसती धारा भिन्न भिन्न । परी पाणी एकचि असणं । धारांठायी ॥१०६३॥
सृष्टी भासते विभिन्न । परि येथे एकचि ब्रह्म असणं । घट मठी एक गगन । तैसे अर्जुना ॥१०६४॥
येथे गुण आकार नाशता । उरते ब्रह्मचि तत्त्वता । जैसे अलंकार ते आटविता । उरे सुवर्ण ॥१०६५॥
ऐसे जीव ब्रह्माचे एकपण । जाणे तोच ज्ञानी जाण । तयासीच बा आत्मज्ञान । सिद्ध झाले ॥१०६६॥
जगी एकत्व पावून । स्वयेचि ब्रह्म होणं । तयालाच मोक्ष पावणं । म्हणती अर्जुना ॥१०६७॥
हे इंद्रिय आणि गुण । ते पंचभुतांचे कालवण । कफ वात पित्त तीन । धातू येथे ॥१०६८॥
या पंचभुताकारण । गुण आकार भासणं । मग ब्रह्माठायी जीवपण । भासे अर्जुना ॥१०६९॥
स्वत: असून चिरंतन । स्वत:स अनित्य मानणं । मग भ्रमीत होऊन जगणं । घडे येथे ॥१०७०॥
परि या देहीच असता । अंतरी अनुभवणे ब्रह्ममयता । मगच जीवभावाची सांगता । होते अर्जुना ॥१०७१॥
स्वयेचि ब्रह्म होऊन । भवचक्रापार जाणं । तयासीच बा ज्ञान । म्हणती अर्जुना ॥१०७२॥
आकार ते टाकता । गुणांच्या पार जाता । प्रकटते ती परब्रह्मता । अर्जुना माझ्या ॥१०७३॥
नद्या जशा समुद्रात । समुद्री एकरूप होतात । तैसे विलीन होणे ब्रह्मात । मोक्ष अर्जुना ॥१०७४॥
ऐसे ब्रह्ममय होता । जीवभाव तो खुंटता । मग द्वैताची ती वार्ता । न उरे तेथे ॥१०७५॥
जैसे अनेक त्या दिव्यात । एकचि प्रकाश असे वसत । तैसे ब्रह्मचि असे नांदत । सर्वत्र अर्जुना ॥१०७६॥
समत्व बुद्धि प्रकटता । अनुभवा येते ब्रह्ममयता । मग मरणाची ती वार्ता । उरेचिना ॥१०७७॥
साक्षी आणि मन समता । हीच ब्रह्ममयतेची रहस्यता । अहंभाव तो संपता । प्रकटे मोक्ष ॥१०७८॥
बुद्धि आणि मन । सर्व कर्मेंद्रियांचं रहाटणं । ते प्रकृतीच्याच अधीन । ओळखे तो ॥१०७९॥
जसे त्या घरात । सर्व माणसे वावरतात । पण काहीच नाही करत । घर जैसे ॥१०८०॥
वा जसे त्या गगनात । ढग असती धावत । पण स्थिर असे रहात । गगन जैसे ॥१०८१॥
तैसे आत्मतत्त्वाच्या प्रकाशात । प्रकृतीच असे खेळत । आणि आत्मतत्त्व साक्षीभावात । स्थिर अर्जुना ॥१०८२॥
अंतरी ऐसे जाणी । तेचि बा खरा ज्ञानी । तेथे अकर्त्याची कहाणी । रहाटे अर्जुना ॥१०८३॥


For Complete Dnyaneshwari Visit : www.esahity.com

ऐसी पृथकता संपणे । अंतरी अभिन्नता जाणणे । तेचि बा ब्रह्ममय होणे । अर्जुना माझ्या ॥१०८४॥
पाणी आणि लहर । रजकण जसे भूमीवर । सूर्य आणि रश्मीकर । तैसे अर्जुना ॥१०८५॥
अवयव जैसे देहात । वा भाव त्या मनात । ठिणग्या त्या अग्नीत । तैसे अर्जुना ॥१०८६॥
सृष्टी प्रकटन ब्रह्माचे । हे अनुभवे मन ज्याचे । पैलतीरा तारू तयाचे । लागले अर्जुना ॥१०८७॥
मग तया जिकडे तिकडे । ब्रह्मचि दिसे चोहीकडे । ऐसे अपार तो जोडे । सुख अर्जुना ॥१०८८॥
ऐसी समग्र पार्था । प्रकृति पुरुष व्यवस्था । अंतरी पहा जाणता । ज्ञान होते ॥१०८९॥
अमृताची चूळ भरणे । अपार संपत्ती सापडणे । तैसे अंतरी ज्ञान होणे । भाग्य अर्जुना ॥१०९०॥
ब्रह्ममयता अनुभवणे । नि ब्रह्ममयतेत स्थिर होणे । तैसेच आता तू करणे । अर्जुना माझ्या ॥१०९१॥
पहा सिद्धांताचे बोल । मी तुला बा सांगेल । मग तहान तुझी वाढेल । ज्ञानाची अर्जुना ॥१०९२॥
असे म्हणताच देवानं । अर्जुन बसला सावरून । सर्वांगाचे करून अवधान । ऐकू लागला ॥१०९३॥
जया परमात्मा म्हणतात । तो राहे ऐशा स्वरूपात । जसा सूर्य होतो प्रतिबिंबित । पाण्यात अर्जुना ॥१०९४॥
सूर्य पाण्यात भासतो । परि तो जलात नसतो । तैसा परमात्मा रहातो । अलिप्त सदैव ॥१०९५॥
आत्मा राहतो देही । हे म्हणणे खरे नाही । तयासी दिशा त्या दाही । अपुऱ्याच की ॥१०९६॥
चेहरा जैसा आरशात । राहे प्रतिबिंब स्वरूपात । तैसा आत्मा देहात । राहतो अर्जुना ॥१०९७॥
देही आत्म्याची भेट । ऐसे म्हणणं बा खोटं । वारा वाळूची गाठ । पडली का कधी ॥१०९८॥
आग आणि कापूस । यांचा कैसा सहवास । भेटणे आकाश पाषाणास । अशक्य जैसे ॥१०९९॥
एक निघे पूर्वेकडे । दुसरा निघे पश्चिमेकडे । तयांची का भेट घडे । अर्जुना कधी ॥११००॥
उजेड आणि अंधारात । जिवंत आणि मृतात । जितका फरक असे असत । तितका अर्जुना ॥११०१॥
रात्र आणि दिवसात । सोने आणि कापसात । जितका फरक असे असत । तितका अर्जुना ॥११०२॥
देह म्हणजे पंचभूत । सदैव वावरे कर्मबंधात । जन्ममरणाच्या फेऱ्यात । अडकला असे ॥११०३॥
संबंध येता अग्नीचा । पत्ता न उरे लोण्याचा । तैसा अनित्य स्वभाव याचा । अर्जुना माझ्या ॥११०४॥
पडता ते आगीत । भस्मच होऊ जात । सापडता कुत्र्याच्या तावडीत । होतसे विष्ठा ॥११०५॥
या देहाचा शेवट । अर्जुना अगदीच वाईट । अळ्या किड्यांची वहिवाट । सडता देह ॥११०६॥
ऐसे या देहाचं सडणं । आणि आत्मा असे चिरंतन । अनादि अनंत स्वयंभूषण । आत्म्याठायी ॥११०७॥
अक्रीय ना क्रियाशील । सूक्ष्म ना स्थूल । चल ना अचल । निर्गुण अर्जुना ॥११०८॥
आभास ना निराभास । अंधार ना प्रकाश । सामान्य ना खास । अरूप अर्जुना ॥११०९॥
रिता ना भारीत । रहित ना सहित । मूर्त ना अमूर्त । शून्यपणे ॥१११०॥
आनंद ना निरानंद । एक ना विविध । मुक्त ना बद्ध । आत्मपणे ॥११११॥
येतुला ना तेतुला । आयता ना रचिला । बोलता ना उगेला । अलक्षपणे ॥१११२॥
तो सृष्टीचा खेळ ना रचे । सर्व संपता जो वाचे । आहे नाही या दोहींचे । मूळस्थान तो ॥१११३॥
मापात नसे मावत । चर्चेत नाही तो येत । नाही वाढत वा घटत । अव्ययपणे ॥१११४॥
म्हणणे हा आत्मा । देहात रहातो प्रियोत्तमा । जशी मठाकाशा उपमा । आकाशाची ॥१११५॥
तयाचेच कारणे । सृष्टीचे होणे जाणे । परि आत्मा अलिप्तपणे । रहातो अर्जुना ॥१११६॥
दिवसरात्र जैसी । येते जाते आकाशी । देहाठायी तैशी । आत्मसत्ता ॥१११७॥


For Complete Dnyaneshwari Visit : www.esahity.com

असूनही या शरीरी । तो काहीच ना करी । उदासीनाच्या परी । राहतसे तो ||११९८||
असूनही देहात । देहभावा नाही लिप्त । उणेपणा तयाच्या स्वरूपात । नच ये कधी ||११९९||
नसे आकाश काही । ऐसी जागाच नाही । परि संगदोष जराही । नसे आकाशा ||११२०||
तैसा सर्वत्र सर्व देही । आत्मा चिरंतन राही । परी संगदोष काही । न लागे तया ||११२१||
ऐसा क्षेत्रापासून अलिप्त । क्षेत्रज्ञ सर्वत्र असे रहात । स्थिर तो साक्षीभावात । राहे अर्जुना ||११२२||
येता चुंबकाच्या संपर्कात । लोह असे हालत । परि चुंबक नाही होत । लोखंड कधी ||११२३||
दिव्याच्या त्या उजेडात । घरात व्यवहार चालतात । पण दिवा असे अलिप्त । तैसे अर्जुना ||११२४||
जैसा त्या लाकडात । अग्नी असे राहत । आत्मा तैसा देहात । राहतो अर्जुना ||११२५||
ढग आणि आकाश । मृगजळ आणि प्रकाश । यांचा जैसा सहवास । तैसा अर्जुना ||११२६||
जसा एक सूर्य आकाशात । पण प्रकाशवी जग समस्त । तैसा आत्मा असे नांदत । जगात अर्जुना ||११२७||
ऐसे क्षेत्रज्ञाचे कारणे । येथे क्षेत्राचे भासणे । परी क्षेत्रज्ञ अभिन्नपणे । असे अर्जुना ||११२८||
जयाने बा अनुभवला । अंतरी क्षेत्र क्षेत्रज्ञाला । तयासीच बा कळला । शब्द माझा ||११२९||
ज्ञानीजनांच्या संगतीत । दोहोंची ओळख असे होत । दोहोंना अनुभवणे अंतरात । ज्ञान अर्जुना ||११३०||
होण्या ज्ञान हे प्राप्त । ते अंतरी शांत होतात । मग क्षेत्र क्षेत्रज्ञा अनुभवत । मुक्त होती ||११३१||
योगाभ्यास करून । अंतरी आकाश अनुभवणं । तेचि असे बा ज्ञान । अर्जुना माझ्या ||११३२||
शरीर मन समस्त । मानून बा तृणवत । ते पंचभुताच्या पार जात । मुक्त होती ||११३३||
ऐशा विविध मार्गांनी । अथक प्रयत्न करूनी । अंती समज ती येऊनि । ज्ञानी होती ||११३४||
क्षेत्र आणि क्षेत्रज्ञाला । जयांनी अंतरी अनुभवला । तेच प्राप्त ज्ञानाला । मानतो आम्ही ||११३५||
ऐसे मनइंद्रिया पार जाणं । पंचभुतासी ओलांडणं । तेच बा आहे ज्ञान । अर्जुना माझ्या ||११३६||
शुक नलिकेची कहाणी । अर्जुना अंतरी जाणुनी । मुक्त होती ज्ञानी । अनायासे ||११३७||
रज्जु सर्पाचा भास । जाणे अर्जुना लयास । तोच ज्ञानी खास । मानतो आम्ही ||११३८||
भ्रम रुप्याचा जाऊन । शिंपली शिंपली दिसणं । तैसे आहे ज्ञान । अर्जुना माझ्या ||११३९||
अस्तित्वा संपूर्ण जाणणे । अंतरी आत्मतत्त्व अनुभवणे । तेचि ब्रह्ममय होणे । असे अर्जुना ||११४०||
अनुभवता अनंत जे आकाशाहून । अनादि आणि चिरंतन । मग द्वैत जे अज्ञान । नुरे अर्जुना ||११४१||
आकार जेथे सरे । जीवत्व तेथे विरे । द्वैत मग ना उरे । अनुभवता अद्वैत ||११४२||
ते परमात्मतत्त्व पार्था । स्वयेचि होती सर्वथा । अनुभवणे आत्म अनात्म व्यवस्था । हंसाप्रमाणे ||११४३||
ऐसा उपदेश आघवा । भगवंताने दिला पांडवा । ज्ञान अर्जुनाचिया जीवा । झाले जैसे ||११४४||
जसे एका कलशातून । पाणी दुसऱ्या कलशात ओतणं । तैसे दिले अर्जुना ज्ञान । भगवंताने ||११४५||
कोण का देते कोणा ज्ञान । तो नर तैसा नारायण । परि उपदेशिले भगवंतानं । अर्जुना ऐसे ||११४६||
परि असो ते बोलणे । सर्वस्व त्या भगवंताने । दिले पहा आनंदाने । अर्जुना तेथे ||११४७||
पार्था पहा तृप्ती । अजून झाली नव्हती । उत्कंठा वाढली होती । अजून त्याची ||११४८||
जसे तेल ते घालता । वाढते दिव्याची प्रकाशता । तैसे वाढली उत्सुकता । ऐकता उपदेश ||११४९||
तेथ सुगरणी आणि उदारे । रसज्ञ आणि जेवणारे । तेथे मिळती मग वाढणारे । सढळपणे ||११५०||
पाहून अर्जुनाचे श्रवण । आणि तयाचे अवधान । भगवंत मग उत्साहानं । बोलेल आता ||११५१||


For Complete Dnyaneshwari Visit : www.esahity.com

जसे वाऱ्याच्या कारणे । मेघांनी गर्दी करणे । भरती चंद्रामुळे येणे । समुद्रा जैसी ॥११५२॥
आनंदमय आघवे । विश्व केले देवे । ते महाराजांनी ऐकावे । म्हणाला संजय ॥११५३॥
ऐसे जे महाभारतात । व्यासांनी कथिले जे भीष्मपर्वात । तेच आता मराठीत । सांगेन मी ॥११५४॥
गुज जे अर्जुन श्रीकृष्णातील । ते मराठीत मी सांगेल । मग तुम्हा ते उमजेल । अनायासे ॥११५५॥
सत्य अध्यात्म ज्ञान । येथे करील मी कथन । ऐकावे ते लक्ष देऊन । श्रोत्यांनो तुम्ही ॥११५६॥
बोलेन मी देशी भाषेत । होईल अमर जे साहित्यात । फिके वाटेल पहा अमृत । तयाच्या पुढे ॥११५७॥
चंद्रापेक्षाही शीतल । बोल ऐसे बोलेल । नादब्रह्मही लाजेल । आज येथे ॥११५८॥
पिशाच्याच्याही मना । आणेन सात्त्विकाचा पान्हा । ऐकता त्या वचना । समाधी जोडे ॥११५९॥
वाणीचा विस्तार करून । अध्यात्मज्ञान पसरवीन । विश्व टाकेन भरून । आनंदाने ॥११६०॥
फिटो अज्ञानाची कहाणी । होता कानामनाची मेळणी । ब्रह्मज्ञानाची उपजणी । होईल येथे ॥११६१॥
दिसो परतत्व डोळा । पाहो सुखाचा सोहळा । प्राप्त होवो बोधाच्या सुकाळा । विश्व सारे ॥११६२॥
आता शब्द ऐसे बोलेल । ज्ञान येथे प्रकटेल । श्रीगुरूंनी जे सांगितलं । सांगेन तुम्हा ॥११६३॥
सोपे शब्द वापरून । सांगेन तुम्हा ज्ञान । अर्थ तो स्पष्ट करून । सांगेन पुन्हा ॥११६४॥
सांगण्या तुम्हा ज्ञान । शक्ती दिली भगवंतानं । म्हणून हे निरूपण । प्रकटेल येथे ॥११६५॥
भगवंताच्याच कृपेनं । घडतसे माझं बोलणं । गीतार्थ करणे कथन । सोपे नाही ॥११६६॥
तुम्हा आलो मी शरण । म्हणून नाही कशाची अडचण । झाले जे हे निरूपण । माझे नाही ॥११६७॥
सरस्वतीपोटी जन्मणं । कैसे येईल मग मुकेपण । कधी का गुणांची वाण । लक्ष्मीठायी ॥११६८॥
तुम्ही सर्व संतजन । मी काय ज्ञान सांगेन । माझे हे निरूपण । कृपा तुमची ॥११६९॥
आता तुम्ही मला । संधी द्यावी बोलण्याला । मग सांगेन मी गीतार्थाला । उघडून येथे ॥११७०॥

ॐतत्सदिति श्रीमद्भगवद्गीतासूपनिषत्सु ब्रह्मविद्यायां योगशास्त्रे
श्रीकृष्णार्जुनसंवादे क्षेत्रक्षेत्रज्ञविभागयोगोनाम त्रयोदशोऽध्याय: ॥१३॥



For Complete Dnyaneshwari Visit : www.esahity.com

# ॥जेथे जेथे मराठी माणूस, तेथे तेथे ज्ञानेश्वरी॥

सर्वत्र वेद यज्ञाचा घाट।अन् सुविद्येचा झडझडाट। वारा सत्वगुणाचा सोसाट। वाहू लागे॥

अशी सुसाट सुगंधी वाऱ्यासारखी ज्ञानेश्वरी सर्वत्र पसरवावी. जगातील प्रत्येक मराठी माणसाने त्याचा आनंद घ्यावा व अवघे जन सुखी व्हावे अशी ज्वलंत आणि तीव्र ईच्छाशक्ती असणाऱ्या सर्व वयाच्या वाचकांनी आमच्याशी संपर्क साधावा. आपण जर अजून एकापर्यंत ही ज्ञानेश्वरी पोहोचवू शकत असलात तरी ते एक महत्त्वाचे काम होईल. सहस्त्र बाहू, लक्ष मने या कार्यात लागले तर हा गोवर्धन सहज उचलू शकतील. आपल्या संपर्कात काही प्रसार माध्यम असेल तर हे काम अधिकच सोपे होईल. आपल्या हाती जे असेल ते साधन वापरून आपण या ज्ञानियांच्या राजाच्या ज्ञानानुभवाचा प्रसार करूया.

ज्ञानेश्वर माऊलींचा संदेश सर्व जगात सुगंधासारखा पसरो आणि सर्व जीव सुखी होवोत अशी प्रार्थना करून या कामाला सुरूवात करूया.

सामिल होण्यासाठी लिहा : esahity@gmail.com

संपूर्ण ज्ञानेश्वरीसाठी भेट द्या : www.esahity.com

Facebook वर पहा : http://www.facebook.com/edyaneshwari

ब्लॉगला भेट द्या : http://edyaneshwari.blogspot.in/

या शिवाय या ज्ञानेश्वरीचे तीस तासांचे सांगीतिक पारायण उपलब्ध असून कोणाला FM Radio किंवा तत्सम प्रसार माध्यमासाठी हवे असल्यास संपर्क साधावा. हे सांगितिक ई पारायण लवकरच स्वरनेटाक्षरी या ई साहित्य प्रतिष्ठानच्या ऑडिओ वेबसाईटवर उपलब्ध होईल.

ई मेल द्वारे दर गुरूवारी एक एक भाग ई साहित्य प्रतिष्ठानच्या सव्वा लाख वाचकांना उपलब्ध केला जाणार आहेच. त्यांच्या मार्फ़त ही ज्ञानेश्वरी किमान बारा लाख मराठी माणसांपर्यंत जाणार हे तर निश्चितच.

जगातील बारा कोटी मराठी मनांपर्यंत ती पोहोचावी ! या ज्ञानयज्ञात आपण सहभागी व्हाल ना!

अध्यात्म विषयाचे सखोल मनन, चिंतन व मंथन करून वेशाने साधू नसलेले, पण वृत्तीने साधू असलेले ज्यांच्यावर मी खूप खूप प्रेम करतो, असे श्री विजयजी पांढरे. विजयजी यांनी 'समग्र ज्ञानेश्वर' अगदी सरळ मराठी भाषेत यावेत यासाठी दिनरजनी अथक प्रयास केला आहे. प्रथम त्यांनी 'अमृतानुभव' अगदी सोप्या व सरळ मराठीत ओवीबद्ध केला, नंतर 'चांगदेव पासष्टी' त्याचबरोबर आता श्री ज्ञानेश्वरीसारखा विशाल व ९०३४ ओव्यांनी ओतप्रोत असलेल्या ग्रंथाला ओवीबध्द करुन पूर्ण केले आहे.

श्री. विजयजी यांच्या या पवित्र कार्याचा व विचाराचा भाविकांनी, ज्ञानेश्वरीवर प्रेम करणाऱ्या वारकऱ्यांनी, अभ्यासूंनी खूप आदर करावा. सर्वांना समजेल, सहज कळेल अशी सोपी भाषा त्यांनी ज्ञानेश्वरीवर प्रतिज्ञानेश्वरी रचतांना वापरली आहे. या मागील त्यांचा पवित्र उद्देश हाच आहे, की संत ज्ञानेश्वर महाराजांची ज्ञानेश्वरी सर्व लोकांना कळावी. म्हणून पारंपारिक संकोचित वृत्तीचा परित्याग करून व्यापक विचाराच्या दृष्टीतून या सोप्या भाषेतील ज्ञानेश्वरीकडे सर्व भाविकांनी व वारकरी संप्रदायातील सर्व संतांनी पाहावे अशी मी आशा करतो. विशेष म्हणजे वारकऱ्यासारखा न दिसणारा परंतु ह्रदयातून पूर्ण वारकरीच असणारा हा तत्त्वचिंतक मी अतिशय जवळून अनुभवलेला आहे. म्हणून त्यांच्या विचाराचा व या आध्यात्मिक कार्याचा खूप आदर करतो . त्यांच्या या कार्याला माझे अनंतानंत शुभ आशीर्वाद. पुन्हा त्यांच्या हातून अशीच वाङ्‌मयीन सेवा घडत राहो ही ईश्वरचरणी प्रार्थना.

परमहितैषी आचार्य स्वामी हरिचैतन्य<br>
गुरुदेव आश्रम, पळसखेड (स.), बुलढाणा

---

आजच्या मराठी भाषेत ओवीबद्ध झालेली अशी ही ओवीरचना भावार्थ ज्ञानेश्वरीच्या रूपाने प्रकटली आहे ती ईश्वरी कृपाच होय. मनुष्याची बुद्धी हे काम नक्कीच करू शकत नाही. हा भावार्थ वाचताना मनाची पकड तर घेतोच पण वाचता वाचता गोडी अधिकच वाढत जाते व मनाचा वेगळ्या विश्वात प्रवेश होतो. आत्मज्ञानासंबंधीचे सविस्तर निरूपण पुन्हा एकदा सुलभ स्वरूपात जनसामान्यांच्या भाषेत ज्ञानेश्वरीची मूळ गोडी घेऊन प्रकटले आहे.

ह.भ.प.संजय महाराज पाचपोर<br>
गुप्तेश्वर संस्थान, मु.पो.शिर्ला, ता.खामगांव जि.बुलढाणा

---

'चांगदेव पासष्टी' व 'अमृतानुभव' आणि 'भावार्थ गीता' या दोन ग्रंथांनंतर आता 'भावार्थ ज्ञानेश्वरी' हा ओवीबद्ध ग्रंथ घेऊन श्री.विजय बळवंत पांढरे वाचकांच्या भेटीला येत आहेत. इथे वाचकांच्या भेटीला हा शब्द मी वापरला पण श्री.विजय बळवंत पांढरे यांच्या या लेखनाचा वाचक हा `टाइमपास` करण्यासाठी छापील माकुरावरून नजर फिरवणारा वाचक नव्हे ! याच्या चित्ताला आध्यात्मिक तळमळीचा, ओझरता का होईना स्पर्श झालेला आहे असा हा वाचक आहे. साधनेच्या मार्गावर पाऊल टाकू इच्छिणारा किंवा ज्याने पाऊल टाकले आहे असा हा वाचक आहे. असा वाचक जेव्हा भगवद्‌गीता, चांगदेव पासष्टी, अमृतानुभव, ज्ञानेश्वरी या ग्रंथांवरील लेखन वाचतो तेव्हा त्याचे वाचन ही त्याच्या आंतरिक साधनेची वाटचाल असते. श्री.विजय बळवंत पांढरे ज्ञानेश्वरीचे साधक, अभ्यासक आहेत; पंडित अभ्यासक नव्हेत. त्यामुळे त्यांच्या ज्ञानेश्वरीच्या अभ्यासाला साधनेचा सुगंध आहे. सर्वसामान्य माणसापर्यंत सुलभीकरणाच्या मार्गाने ज्ञानेश्वरी पोचवण्याचा श्री.विजय बळवंत पांढरे यांचा हा प्रयत्न त्यांच्या हेतूची पूर्तता करणाच्या दृष्टीने यशस्वी ठरेल असा मला विश्वास वाटतो.

कविवर्य मंगेश पांडगावकर,<br>
साईप्रसाद, सायन(प), मुंबई

---

ज्ञानेश्वरी ही मराठी भाषेत असली, तरी आमच्या मराठी भाषिकाला ती समजणे अवघड जाते हे खरे. कारण ज्ञानेश्वरीत यादवकाळात प्रचलित असलेले शब्द व विधानांची वळणे आहेत. विजय पांढरे यांनी ज्ञानेश्वरीचे ह्रदगत नीट सांभाळून प्रचलित मराठीत आणले आहे व ते बरेच सुबोध झाले आहे. भाषा-भाषांमधील प्रवास चांगल्या वाटाड्याच्या सहाय्याने अर्थाला निर्वेधपणे करता येतो.

श्री. पांढरे यांचे निर्वाहाचे क्षेत्र वेगळे आहे, तरी ज्ञानेश्वरांनी त्यांना वेड लावले. त्यामुळे रूपांतराच्या निमित्ताने एका लोकोत्तर साक्षात्कारी संतांच्या योगयुक्त वाणीच्या मनोमय सान्निध्यात त्यांना काही काळ घालवता आला. त्यामुळे उरलेल्या आयुष्याची पाऊलवाट सोन्याची झाल्याची कृतकृत्यता त्यांना मिळेल. संतांचा एवढा प्रसादही पूर्वसंचितामुळेच लाभू शकतो, त्याबद्दल त्यांचे अभिनंदन.

मा. राम शेवाळकर, नागपूर

esahity@gmail.com

ई साहित्य प्रतिष्ठान®

www.esahity.com

## श्री विजय पांढरे यांची ओळख

श्री विजय बळवंत पांढरे (BE Civil) हे मुख्य अभियंता, महाराष्ट्र अभियांत्रिकी संशोधन संस्था, (M.E.R.I.), नाशिक येथे अधीक्षक अभियंता व सहसंचालक या पदावर कार्यरत असून त्यांनी चांगदेव पासष्टी, अमृतानुभव, भगवद्गीता व ज्ञानेश्वरी या चारही ग्रंथांचे आधुनिक प्रचलीत मराठीत सुलभ असे ओवीबद्ध रुपांतर केले अनुवाद केले आहेत. सदर ओवीबद्ध ग्रंथ ऑडिओ स्वरुपात व छापील स्वरूपातही उपलब्ध आहेत. त्यांनी नुकतीच अष्टावक्रगीताही आजच्या मराठीत ओवीबद्ध केली आहे. अध्यात्म हा चित्तस्थिरीकरणाचा , चित्तशुद्धीचा व चित्तलयाचा विषय असल्याचे या सर्व ग्रंथातून त्यांनी स्पष्टपणे मांडले आहे. सर्व धर्म, सर्व मार्ग, सर्व साधना, सर्व गुरू, सर्व ग्रंथ या सगळयांचे सार तेच आहे. सर्वांनी असा शास्त्रीय दृष्टीकोन बाळगल्यास आत्मज्ञान दूर नाही असे ते स्वानुभवावर सांगतात. (दूरभाष : ९८२२९९२५७८)

## ई साहित्य प्रतिष्ठान

२००८ पासून मराठी ई पुस्तकांच्या निर्मितीत आणि वितरणात महत्त्वाचा वाटा ई साहित्य प्रतिष्ठानने उचलला आहे. आजवर २०० हून अधिक ई पुस्तकांची निर्मिती करणाऱ्या ई साहित्य प्रतिष्ठानचे आजघडीला सव्वा लाख वाचक आहेत. या सर्व वाचकांपर्यंत ही ई पुस्तके विनामूल्य वितरित केली जातात.

विनामूल्य ई पुस्तकांसाठी मेल पाठवा : esahity@gmail.com

अधिक माहिती साठी भेट द्या : www.esahity.com

फ़ोन : ९८६९६७४८२०